# प्रत्येक माणूस हा स्वत:चा 'ब्रँड ॲम्बेसिडर' असतो!

## मान्यवरांनी दिला युवकांना यशाचा कानमंत्र

**सकाळ वृत्तसेवा**

औरंगाबाद, ता. ९ : प्रत्येक माणूस हा स्वत:चा 'ब्रँड ॲम्बेसिडर' असतो. कोणत्याही चांगल्या कामाची सुरवात स्वत:पासूनच करावी. कारण महाराष्ट्रातील माणूस जगात कोठेही वावरू शकतो, असा मोलाचा कानमंत्र अमेरिकेतील आशीष चौगुले यांनी रविवारी (ता. नऊ) येथे दिला. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, मराठवाडा लोकविकास मंचतर्फे (मुंबई) देवगिरी महाविद्यालयाच्या प्रांगणात सुरू असलेल्या 'शोध मराठी मनाचा' या जागतिक मराठी संमेलनातील 'समुद्रापलीकडे' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मंदार जोगळेकर (अमेरिका), हर्षवर्धन भावे (सिंगापूर) यांचीही उपस्थिती होती. जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे आणि दूरदर्शनचे निवेदक नितीन केळकर यांनी त्यांना विविध प्रश्न विचारून बोलते केले.

श्री. चौगुले पुढे दिलखुलासपणे संवाद साधताना म्हणाले, की जगातील प्रत्येक कार्यक्षेत्रात आगामी काळात भारतीय माणूस चमकणार आहे. कारण भारताकडेच सर्वात जास्त तरुणांची शक्ती आहे. मात्र यासाठी तरुणाईला सर्वांगीण शिक्षण देऊन त्यांचा विकास साधला गेला पाहिजे. आपल्या देशात अनेक संशोधक आहेत. त्यांनी केलेल्या संशोधनाचे अन्य देशांनी कौतुक केले तरच त्याचे महत्व आपल्याला पटते, असेही ते म्हणाले.

श्री. जोगळेकर म्हणाले, की यापुढे पुस्तके केवळ वाचण्यासाठीच नसतील तर ती ऐकता व पाहताही येतील. मराठीतील नावाजलेल्या पुस्तकांच्या ई-बुक्स आवृत्त्या प्रकाशित करण्याच्या पध्दतीमुळे यापुढे प्रकाशनावर होणारा खर्च मोठ्या प्रमाणात कमी करता येईल. नवमाध्यमातून वाचनसंस्कृती वाढत आहे, असेही ते म्हणाले. श्री. भावे म्हणाले, की येत्या काळात अभियांत्रिकीपेक्षा जैव तंत्रज्ञानालाच जास्त वाव मिळणार आहे. कारण देशाला आज खऱ्या अर्थाने बायोटेकची गरज आहे. आयटीनंतर सर्वात मोठी संकल्पना बायोटेकचीच असेल. हे क्षेत्र नवीन असून यामध्ये संशोधन आणि रोजगाराच्या संधीही मोठ्या प्रमाणावर आहेत.



**औरंगाबाद : समुद्रापलीकडे भाग-२ मध्ये आशिष चौघुले, मंदार जोगळेकर आणि हर्षवर्धन भावे यांनी संवाद साधला.**